महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेच्या अंमलबजावणी कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन शुद्धिपत्रक क्रमांक ग्रापाधो-१११२/प्र.क्र.१३३/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : १४ ऑगस्ट, २०१२**

वाचा : १) पा. पु.व स्व. वि., शा.नि. क्र. ग्रापाधो-११११/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक : १८ नोव्हेंबर, २०११
२) पा. पु.व स्व. वि., शा.शुद्धीपत्रक. क्र. ग्रापाधो-११११/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक : ३० जानेवारी, २०१२
३) पा. पु.व स्व. वि., शा.शुद्धीपत्रक. क्र. ग्रापाधो-११११/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक : ०८ फेब्रुवारी,२०१२.

**प्रस्तावना :**

राज्यातील ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबांना खाजगी नळजोडण्या व वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी **महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना** संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये राज्यात सुरु करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र. २ व ३ येथील शासन शुद्धीपत्रकान्वये या योजनेच्या अंमलबजावणीच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये निदर्शनास आलेल्या तुटी विचारात घेऊन त्यात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुद्धिपत्रक :**

संदर्भ क्र.१ येथील दि.१८ नोव्हेंबर,२०११ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ६ पुढीलप्रमाणे वाचावा :

६. जागे अभावी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबांना वैयक्तिक शौचालय बांधकाम करणे शक्य नसेल अशा ठिकाणी, सामुदायिक शौचालय बांधकामाची कामे करता येतील. अशा ठिकाणी सामुदायिक शौचालय बांधण्यासाठी आवश्यक ती जागा ग्रामपंचायतीने किंवा संबंधितांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. **अनुसुचित जाती व नवबौध्द कुटुंबियांसाठी वैयक्तिक शौचालये किंवा सामुदायिक शौचालये ही केवळ दोन शोषखड्ड्यांवर आधारित बांधावीत.** अशा वस्त्यांमधील गावे / वाड्यांमधील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबांमध्ये बांधण्यात आलेल्या सामुदायिक शौचालयावर पाऊसपाणी संकलन संच बसवून पाणी उपलब्ध करुन देणे तसेच विजेसाठी सौर उर्जेचे आवश्यक संच बसविणे इत्यादी कामे देखील घेता येतील.

२. संदर्भ क्र.३ येथील दि.०८ फेब्रुवारी,२०१२ चे शासन शुद्धीपत्रक अधिक्रमित करण्यात येत असून, त्यातील परिच्छेद क्र.८ खालीलप्रमाणे वाचावा :

८. ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत घ्यावयाच्या गावांच्या निवडीसाठीचा प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे राहील:

१) जिल्ह्यातील निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेली गावे त्यापैकी अनुसुचित जाती व नवबौद्ध कुटुंबांची संख्या जास्त आहे.

२) निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेल्या गावांव्यतिरिक्त अन्य गावे, त्यापैकी अनुसुचित जाती व नवबौद्ध कुटुंबांची संख्या जास्त आहे.

३) जिल्ह्यातील निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेली गावे किंवा त्याव्यतिरिक्त अन्य गावांमध्ये संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत वा अन्य कार्यक्रमांतर्गत अनुसुचित जाती व नवबौद्ध कुटुंबांसाठी बांधलेली शौचालये जी मोडकळीस आल्याने वापरण्यास अयोग्य आहेत, अशा शौचालयांची कामे या योजनेतून अनुज्ञेय राहतील.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी, या प्राधान्य क्रमानुसार जिल्ह्यासाठी शासनाकडून एकुण उपलब्ध होणारा / झालेला निधी (किंवा मागील आर्थिक वर्षात उपलब्ध झालेला निधी) व त्यामध्ये बसू शकणारी

गावे यांचा मेळ घालून त्यानुसार जिल्ह्यातील गावांची निवड करावी. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी, या योजनेअंतर्गत खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालयांची अंदाजपत्रके व आराखडे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), यांच्या समन्वयाने नियमित अथवा कंत्राटी अभियंत्यांकडून तयार करुन घ्यावेत. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालयांच्या प्रस्तावांना तांत्रिक मान्यता दयावी. जिल्हा परिषदेने त्यांच्या विहित कार्यपद्धतीनुसार या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देऊन या योजनेची अंमलबजावणी करावी. या योजनेअंतर्गत खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालयांची अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्यासाठी २ टक्के प्रकल्प व्यवस्थापन शुल्क अनुज्ञेय राहील, ज्याचा खर्च प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्यात यावा.

३. सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०८१४१३३१३५१८०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ल.गो.ढोके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
३. सर्व विधी मंडळ सदस्य
४. प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक
५. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहायक
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
७. विभागीय आयुक्त (सर्व)
८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०. संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे,
११. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (WSSO) बेलापूर, नवी मंबई
१२. महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१३. महालेखापाल, महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१४. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
१५. उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
१६. सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
१७. सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१८. सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ
१९. सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
२०. सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
२२. सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
२३. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी
२४. सर्व विशेष समाज कल्याण अधिकारी
२५. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये,
२६. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
२७. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२८. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
२९. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मंुबई
३०. मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
३१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
३२. निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७